# प्रेसनोट

दि. १८/०४/२०२४

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | भिंगार कॅम्प पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७(अ), १२ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)श्रीमती रूबिया मोहम्मद हनिफ शेख,वय– ३५ वर्ष,पद – सहाय्यक अभियंता,वर्ग –१, नेमणुक – पाटबंधारे संशोधन व जल नि:सारन उपविभाग,अहमदनगर<br>२)श्रीमती रजनी पाटील,कार्यकारी अभियंता,वर्ग–१,पाटबंधारे संशोधन विभाग,मेरी,दिडोरी रोड,नाशिक |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | एकुण ७,७५,०००/–रू अदा बिलाच्या रकमेचे १८ टक्के प्रमाणे १,३९,५००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १८ टक्के रकमेचा पहिला हप्ता म्हणुन ६२,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांच्या कार्यक्षेत्रातील उंबरे,ता.राहुरी येथील पुर्ण झालेल्या कामाचे देयक ७,७५,९६३/– रू अदा केले म्हणुन सदर कामाच्या अदा केलेल्या बिलाचे यातील आलोसे १ श्रीमती शेख यांनी स्वत:साठी ८ टक्के प्रमाणे व आलोसे २ यांचेकरीता १० टक्के प्रमाणे असे एकुण १८ टक्के प्रमाणे १,३९,५००/–रूपये लाचेची मागणी करत असलेबाबत ची तक्रार ला.प्र.वि.अहमदनगर कडे आज दिनांक १८/०४/२०२४ रोजी प्राप्त झाली होती. त्यानुसार आज दिनांक १८/०४/२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली असता सदर लाच मागणी पडताळणी दरम्यान आलोसे क्र.१ श्रीमती रूबिया शेख यांनी तक्रारदार यांच्याकडे सदर कामाचे अदा केलेलया बिलाच्या रकमेचे स्वत:साठी ८ टक्के प्रमाणे व आलोसे क्र.२ श्रीमती रजनी पाटील यांच्याकरीता १० टक्के प्रमाणे असे एकुण १८ टक्के लाचेची मागणी करत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार आज दिनांक १८/०४/२०२४ रोजी आलोसे क्र.१ श्रीमती रूबिया शेख यांचे विरूध्द सापळा कारवाई आयोजित करण्यात आली.सदर सापळा कारवाई मध्ये आलोसे क्र.१रूबिया शेख यांनी १८ टक्क्यांचा पहिला हप्ता म्हणुन ६२,०००/– रूपये पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडुन स्विकारले.त्यावेळी त्यांना लाच रकमेसह रंगेहात पकडण्यात आले आहे.तसेच सदर लाच रक्कम स्विकारणेस आलोसे क्र.२ श्रीमती रजनी पाटील यांनी दुजोरा दिला म्हणुन आलोसे क्र.१ श्रीमती रूबिया शेख व आलोसे क्र.२ रजनी पाटील यांचेविरूध्द भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर